दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अनुसार दिव्यांगत्वाचे एकूण २१ प्रवर्गातील दिव्यांग लाभार्थी यांना राज्य व तत्सम यंत्रणाच्या योजना, सवलती, लाभ, अनुदान वा तत्सम इतर फायदे यांचा लाभ घेण्याकरिता ग्राहय ठरविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन परिपत्रक क्रमांक दिव्यांग -२०२१/ प्र.क्र.५४/ दि.क. २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय मुंबई -४०००३२
दि.१३ सप्टेंबर, २०२२

वाचा:-

१. अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५.
२. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६.
३. केंद्र शासनाची अधिसूचना दि.२५ एप्रिल २०१६ (स्वमग्नता बाबतच्या मुल्यमापन व प्रमाणीकरणाबाबतच्या मार्गदर्शक सुचना)
४. महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण,२०१८.
५. केंद्र शासनाची अधिसूचना दि.०४ जानेवारी,२०१८ (स्वमग्नता वगळता इतर २० दिव्यांगत्वाबाबत मुल्यमापन व प्रमाणिकरणाबाबतच्या मार्गदर्शक सुचना)
६. सार्वजनिक आरोग्य विभागाचा शासन निर्णय क्र.अप्रवि-२०१८/ प्र.क्र.४६/आरोग्य-६ दि.१४.सप्टेंबर, २०१८.

प्रस्तावना -:

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम ३ (I) अनुसार दिव्यांगत्वाचे खालील ०७ प्रकार विनिर्दिष्ट केलेले आहेत:-

१. अंधत्व
२. क्षीण दृष्टी
३. कुष्ठरोग मुक्त झालेल्या व्यक्ती
४. श्रवण शक्तीतील दोष
५. चलन-वलन विषयक विकलांगता
६. मतिमंदता
७. मानसिक आजारपण

PDF Scanner ACE Scanner

केंद्र शासनाने वाचा मधील क्र.०१ चा अधिनियम अधिक्रमित करुन दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ हा नवीन अधिनियम दि.२८.१२.२०१६ रोजी अधिसूचित केला आहे. सदर अधिनियमाची दि.१९.०४.२०१७ पासून केंद्र शासनाच्या अधिसूचनेद्वारे अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्याद्वारे दिव्यांग व्यक्तींना समान संधी व हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा प्रदान करण्यात आलेल्या समान संधी व हक्काच्या आधारे दिव्यांग व्यक्तींना सामाजिक, आर्थिक व स्व: उत्थानाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास तसेच सामान्य व्यक्तींप्रमाणे सुसह्य जीवन जगण्यासाठी योग्य अशा संधी उपलब्ध करुन देणेबाबतची तरतुद केली आहे. त्या अनुषंगाने वाचा मधील क्र.०४ अन्वये महाराष्ट्र शासनाने राज्याचे दिव्यांग धोरण अंमलात आणलेले आहे.

यापूर्वी अस्तित्वात असलेला अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम ,१९९५ अधिक्रमित करण्यात आला असल्याने सदर कायद्यातील तरतुदीनुसार दिव्यांगत्वाच्या एकूण ०७ प्रवर्गासह दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मध्ये दिव्यांगत्वाच्या एकूण २१ प्रवर्गाचा समावेश करण्यात आला आहे. सदर २१ दिव्यांग प्रवर्ग खालीलप्रमाणे आहेत:-

१. Loco Motor Disability (अस्थिव्यंग)
२. Leprosy Cured Person (कुष्ठरोग निवारित/मुक्त)
३. Cerebral Palsy (मेंदुचा पक्षाघात)
४. Dwarfism (शारिरीक वाढ खुंटणे)
५. Muscular Dystrophy (स्नायुंची विकृती)
६. Acid Attack Victims) आम्ल हल्ला पिडीत
७. Blindness (पुर्णत: अंध)
८. Low Vision (अंशत: अंध)
९. Hearing Impaired (Deaf and hard of Hearing) (कर्णबधीर/ऐकू कमी येणे)
१०. Speech and Language Disability (वाचा / भाषा दोष)
११. Intellectual Disability (बौध्दिक अक्षम)
१२. Specific Learning Disability (विशिष्ट अध्ययन अक्षम)
१३. Autism Spectrum Disorder (स्वमग्न)
१४. Mental Behavior / Mental illness (मानसिक वर्तन/मानसिक आजार)
१५. Multiple Sclerosis (हातापायांतील स्नायू कमजोर/ शिथिल होणे)
१६. Parkinson॰s disease (कंपवात)
१७. Haemophilia ( अधिक रक्तस्त्राव )
१८. Thalassemia (रक्तांची कमतरता)
१९. Sickle Cell Disease (रक्ताचे हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी होणे.)



PDF Scanner ACE Scanner

२०. Chronic Neurological Condition (मज्जासंस्थेचे तीव्र आजार)

२१. Multiple Disabilities (बहुविकलांग)

वाचामधील क्र.०२ च्या अधिनियमातील कलम २(आर) नुसार "लक्षणीय दिव्यांगत्व असणारी व्यक्ती (person with benchmark disability)" म्हणजे "a person with not less than forty per cent. of a specified disability where specified disability has not been defined in measurable terms and includes a person with disability where specified disability has been defined in measurable terms, as certified by the certifying authority" अशाप्रकारे व्याख्या नमूद केलेली आहे. वाचामधील क्र.३ नुसार स्वमग्नता बाबतच्या मुल्यमापन व प्रमाणीकरणाबाबतच्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

वाचामधील क्र. ५ नुसार स्वमग्नता वगळता इतर २० दिव्यांगत्वाचे मुल्यमापन व प्रमाणिकरणाबाबतच्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

संबंधित शासकीय कार्यालयांकडून अद्यापही पूर्वीप्रमाणेच दिव्यांगत्वाच्या ७ प्रकारांमध्ये येणाऱ्या व्यक्तींनाच शासनाच्या योजना/सवलती इ.चा लाभ देण्यात येत असल्याने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील समाविष्ट झालेल्या २१ दिव्यांगत्वाच्या प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना राज्य शासन व तत्सम यंत्रणाच्या योजना, सवलती, लाभ, अनुदान वा तत्सम इतर फायदे यांचा लाभ घेताना अडचणी / समस्या येत असल्याबाबतच्या तक्रारी दिव्यांग व्यक्तींच्या संघटना / संस्था / पालकांच्या संघटना व दिव्यांग क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती यांच्याकडुन संबंधीत नवीन अधिनियम २०१६ लागू झाल्यापासून सातत्याने प्राप्त होत आहेत. सबब वाचा क्र.२ मधील २१ दिव्यांग प्रकारांचा संदर्भ विचारात घेऊन शासकीय योजनांचा लाभ दिव्यांगांना मिळण्याच्या दृष्टीने सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक -:**

या शासन परिपत्रकान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील विविध कलमांतील तरतुदीनुसार शासनाच्या संबंधित प्रशासकीय विभागाच्या अखत्यारितील दिव्यांगांच्या कल्याणार्थ अंमलात असलेल्या योजना, उपक्रम व तत्सम यंत्रणाच्या योजना, सवलती, लाभ, अनुदान वा तत्सम इतर फायदे (शासकीय आस्थापनांतील दिव्यांगांच्या आरक्षणाच्या तरतुदी वगळता) यांचा लाभ घेण्याकरिता उक्त २१ प्रकारातील सर्व दिव्यांग व्यक्तींना ग्राहय / पात्र करण्यात येत आहे व त्यानुसार त्याची अंमलबजावणी करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील परिशिष्टामध्ये " विनिर्दीष्ट दिव्यांगत्व " म्हणून संबोधल्या जाणाऱ्या व अधिनियमातील कलम २ (आर) नुसार व्याख्या केलेल्या लक्षणीय स्वरुपाचे दिव्यांगत्व धारण करणाऱ्या आणि संबंधित दिव्यांग व्यक्तीचे दिव्यांगत्वाचे



PDF Scanner ACE Scanner

प्रमाण ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिकचे आहे, असे अधिकृत प्राधिकरणाने प्रमाणित केलेले असणाऱ्या व्यक्तींना सदर शासन परिपत्रकाच्या तरतुदी लागू राहतील.

२. मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग तसेच मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था यांना सुचित करण्यात येते की, विभागाशी संबंधित असलेल्या दिव्यांगांच्या कल्याणार्थ अंमलात असलेल्या योजना, उपक्रम, सवलती, अनुदान वा तत्सम इतर फायदे यांचा लाभ घेण्याकरिता उक्त २१ प्रकारातील दिव्यांग व्यक्तींना ग्राहय/पात्र ठरविण्यात येत आहे.

३. या नव्याने समाविष्ट दिव्यांगत्वाच्या प्रवर्गाच्या अनुषंगाने करावयाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनुसार विषयानुरुप त्या त्या विषयांशी संबंधित प्रशासकीय विभागाद्वारे विविध योजना / कार्यक्रम आखून त्यावर स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात यावेत व त्यासाठी संबंधित विभाग आवश्यकतेनुसार त्या त्या विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतुद करेल.

४. सर्व मंत्रालयीन विभागांनी तसेच अधिनियमातील कलम २ (बी) मध्ये परिभाषित केल्यानुसार "समुचित शासन (Appropriate Government) या व्याखेत अंतर्भुत होत असलेल्या इतर विभाग / कार्यालयांनी अधिनियमातील:-

अ) कलम २४ अनुसार समान योजनांमधील सामान्य व्यक्तींना लागू होणाऱ्या लाभापेक्षा दिव्यांगांना किमान २५ टक्के अधिक लाभ अनुज्ञेय करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती तरतूद करावी.

ब) कलम ३७ अनुसार कृषीविषयक योजना, गृहनिर्माण विषयक, दारिद्र्य निर्मुलन विषयक योजना, सवलतीच्या स्वरुपात जमीन वाटप व इतर विकासात्सक योजनांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के आरक्षण ठेवावे.

५. शासनाच्या सध्या सुरु असलेल्या दिव्यांगविषयक कार्यक्रम/उपक्रम/योजना पूर्ववत सुरु राहतील.

६. सदर शासन परिपत्रकान्वये संबंधित योजना उपक्रमाचा दिव्यांग व्यक्ती म्हणून लाभ घेण्याकरीता संबंधीत व्यक्तीचे दिव्यांगत्व आरोग्य विभागाचा शासन निर्णय दि. १४.०९.२०१८ मधील तरतूदीनुसार सक्षम वैद्यकीय मंडळाने अथवा अपिलीय प्राधिकरणाने विहीत प्रमाणपत्राद्वारे प्रमाणित करणे आवश्यक राहील.

७. या शासन परिपत्रकात काहीही अंतर्भुत असले तरी या शासन परिपत्रकातील तरतुदी हया दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ३४ च्या अनुषंगाने यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले शासकीय आस्थापनेतील सरळसेवा व पदोन्नती संदर्भातील सामान्य प्रशासन विभागाचा



PDF Scanner ACE Scanner

शासन निर्णय दि.०५.०३.२००२, शासन निर्णय, दि.२९.०५.२०१९ आणि शासन निर्णय दि.०५.०७.२०२१ या शासन निर्णयांच्या तरतूदीच्या अधिन राहतील.

८. ज्या दिव्यांग व्यक्ती कायमस्वरुपी दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक आहेत, त्यांना शासनाच्या कायमस्वरुपी लाभाच्या योजनांचे लाभ अनुज्ञेय राहतील. तर ज्या दिव्यांग व्यक्ती ठराविक कालावधीकरिता दिव्यांग प्रमाणपत्र धारण करतात, त्या दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्रातील नमुद कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात अंमलात असलेल्या योजनांचे लाभ अनुज्ञेय राहतील.

९. सदरचे शासन परिपत्रक हे शासनाचे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग त्यांचे नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालये, अंगीकृत उपक्रम, महामंडळे, शासकीय वित्तीय संस्था, अनुदानित संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादींना दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६, दि.१९.०४.२०१७ रोजी लागू झाल्यापासून लागू राहील.

१०. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२२०९१३१५४८४६०२२२ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2022.09.13 15:53:46 +05'30'

**(वि.पुं.घोडके)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति.**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय मुंबई,
४. मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.राज्य मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
७. मा.विधानसभा/विधान परिषद सर्व सदस्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई,
१०.सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमख,
११.आयुक्त, दिव्यांग कल्याण, आयुक्तालय, पुणे,



PDF Scanner ACE Scanner

१२.आयुक्त, समाज कल्याण, आयुक्लतालय, पुणे,
१३.सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
१४.सर्व आयुक्त, महानगरपालिका,
१५.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
१६.सर्व समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषदा,
१७.भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरेक नं. १, योगक्षेमसमोर, वसंतराव नाईक चौक, नरिमन पॉईन्ट, मुंबई ४०० ०२१,
१८. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश, काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२५,
१९. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, राष्ट्रपती भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईन्ट, मुंबई ४०००२१,
२०.शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई ४०० ०२८,
२१.बहुजन समाज पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई, ४०००१३,
२२.भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई, ४०० ०१३,
२३.भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई, ४०० ०१३,
२४.महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०० ०२८,
२४.निवड नस्ती/दिव्यांग कल्याण-२.



PDF Scanner ACE Scanner